# मेट्रो ३ : पहिल्या टप्प्याचे काम ८६.४ टक्के पूर्ण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात असून, आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे काम ८६.४ टक्के पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०२३ पर्यंत मेट्रोच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पाठपुरावा सुरू केला आहे. विविध स्थानकांचे काम, प्लॅटफॉर्मचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे दिसून आले आहे.

आरे ते बीकेसी या पहिल्या पहिल्या टप्प्यादरम्यान स्थानक आणि भुयारी मार्गाचे काम ९७.६ टक्के पूर्ण झाले आहे, तर संपूर्ण कार्यप्रणालीचे ६३.३ टक्के, संपूर्ण स्थानकांचे कामकाज ९२.६ टक्के, मुख्य मार्गिकेचे ट्रॅक काम ८० टक्के तर ऑपरेशन प्रणालीचे ५७ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर बीकेसी ते कफ परेड या दुसऱ्या टप्प्यादरम्यान ७६ टक्के काम पूर्ण झाल्याचे एमएमआरसीएलने स्पष्ट केले आहे. त्यामध्ये स्थानकांचे ९४.९, स्थानकांतर्गत संपूर्ण बांधकाम ८७.३, एकूण कार्यप्रणाली ४१.३ टक्के आणि मुख्य मार्गिकेचे ट्रॅक काम ४५ टक्के आणि ऑपरेशन कार्यप्रणालीचे ४६ टक्के काम पूर्ण झाले आहे.कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम ८०.६ टक्के पूर्ण झाले आहे.